महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी.एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०.
दूरध्वनी क्रमांक कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६१
Email : gpmiraj@gmail.com Website : www.gpmiraj.ac.in

जा.क्र.:-शांतनिमि/वि वि/हि.प.२०२१ / 1679 दिनांक:- OCT 2021

**अत्यंत महत्वाचे परिपत्रक :-**

**विषय :- हिवाळी परीक्षा २०२१ विद्यार्थ्यांना परीक्षाअर्ज भरणे विषयक महत्वाचे सुचना/मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे बाबत..**

संदर्भ:-१)मा.सचिव म.रा.तं.शि.मडळ ,मुंबई यांच्या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिम/का-डी-४०/हि.प.२०२१ /परीक्षाअर्ज/२०२०-२१/१३५ Date-०१/०९/२०२१

संस्थेतील शै.वर्ष २०२१ - २२ मध्ये प्रवेशित व्दितीय व तृतीय वर्ष मधील नियमित आणि बॅकलाग विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, हिवाळी परीक्षा २०२१ करीता बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी मा.सचिव,म.रा.तं.शिक्षण मंडळ मुंबई यांनी संदर्भिय परिपत्रक जोडले असून त्याचे अवलोकन करावे.सदरचे परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेआहे.

| अ. क्र. | रु. ६००/-नियमित शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची मुदत. | रु.२००/-विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची मुदत.(रु.६००+२००=८००) | विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची मुदत.(रु.६००+१५००=२१००) |
|---|---|---|---|
| १ | दि.०४/१०/२०२१ ते १७/१०/२०२१ | दि.१९/१०/२०२१ ते २१/१०/२०२१ | दि.२३/१०/२०२१ ते २५/१०/२०२१ |

**परीक्षा शुल्क भरण्यासाठी बॅकेचा तपशील**

| | |
|---|---|
| Account Name | Principal Governement Polytechnic, Miraj |
| Account No | 31955842838 |
| Bank | State Bank of India |
| Branch | Miraj |
| IFSC Code | SBIN0000428 |

१. सदर्भ क्र १ नुसार विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, हिवाळी परीक्षा २०२१ चे परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरु झाली आहे.विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन त्याच्या प्रतिसह विहीत शुल्कासह खालील वेळापत्रकानुसार विद्यार्थी विभागात दि.१६/१०/२०२१ पुर्वी जमा करावेत. जे विद्यार्थी विहीत मुदतीत त्यांचे परीक्षा अर्ज जमा करणार नाहीत.ते विद्यार्थी हि.प.२०२१ परीक्षे पासून वंचित रहातील.तेव्हा होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार रहातील याची नोंद घ्यावी.

२. जे विदयार्थी बाहेरगावचे आहेत ज्यांना प्रत्यक्षात संस्थेत येऊन अर्ज जमा करता येणार नाहीत अशा विदयार्थ्यांनी परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन अर्जाची प्रत व वर नमुद केलेल्या बँक अकाउट वर ऑनलाईन पैसे भरल्याचे चलनाची प्रत (Screen Shot) PDF स्कॅन करुन विहीत शुल्कासह विद्यार्थी विभागाच्या ssgpmiraj@gmail.com या e-mail ID वर दि.१६/१०/२०२१ पुर्वी पाठवावे. अर्जावर विद्यार्थ्यांची सही स्वत:चा अचुक मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी आणि शैक्षणिक वर्ष (FIRST/SECOND/THIRD) नमुद करावा. सर्व विषय स्पष्टपणे नमुद करावे .तसेच परीक्षा शुल्क संस्थेच्या बँक खात्यात Transfer केल्याचा Transaction ID लिहावा.आणि

अर्जाची प्रत संस्थेस ई-मेल पाठवितांना परीक्षा अर्जाची स्पष्ट दिसणारी PDF प्रत असावी. जेणे करुन ई-मेल मधून तीची प्रिंट घेता येईल व सर्व Detail स्पष्ट दिसणे आवश्यक आहे. ज्यांचे अर्ज अर्धवट असल्यास परीक्षा अर्ज निश्चित करण्यात येणार नाही.

३.परीक्षा अर्ज भरल्या नंतर संस्थेत(विद्यार्थी विभागात) जमा करण्यापुर्वी विद्यार्थ्याने आपल्या अर्जातील **स्वतःचा फोटो,सही, नाव, मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी आणि अभ्यासक्रम व सर्व विषय अचुक असल्याचे तपासून पहावे** व त्यात काही बदल असल्यास तात्काळ विद्यार्थी विभागाशी संपर्क करावा व दुरुस्ती करुन घ्यावी अर्ज संस्थास्थरावर(Confirm)निश्चीत झाल्यानंतर कोणताही बदल केला जाणार नाही. आपला अर्ज संस्थेस प्राप्त झाला कींवा नाही ही खात्री करण्याची संपुर्ण जबाबदारी विद्यार्थ्याची आहे.

४.संस्थेने विद्यार्थ्यांचा अर्ज निश्चित (Confrim) केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या Login मध्ये RBTE Recipet प्राप्त करुन घ्यावी. जेणेकरुन विद्यार्थ्याला आपला परीक्षा अर्ज निश्चीत झाल्याची खात्री करता येईल.

५.ज्या विद्यार्थ्यांनी पुर्वीच्या परीक्षे दरम्यान गैरप्रकार /कॉपीकेस बाबतची शिक्षा पुर्ण झाली आहे.अशा विद्यार्थ्यांनी हिवाळी परीक्षा २०२१ करीता परीक्षा अर्ज भरण्याकरीता विद्यार्थी विभागाशी संपर्क करावा.

६.विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरतांना विशेष काळजी घेऊन Optional/Elective विषयाची निवड करावी.विद्यार्थ्यांनी ज्या Optional/Elective विषयाचे सत्रकर्म (Term work) पुर्ण केले असाच विषय परीक्षा अर्जात नमुद करावा.

७.वरील नमुद केलेल्या कालावधीत परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.परीक्षा अर्ज भरतांना काही अडचण निर्माण झाल्यास त्वरीत विद्यार्थी विभागाशी संपर्क करावा.

तेव्हा संदर्भिय परिपत्रक सर्वविभागप्रमुखांनी आपल्या विभागातील आधिकारी/कर्मचारी /विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणुन द्यावे.

(कॅप्टन डॉ.नि.पां.सोनजे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,मिरज.

सोबतः- संदर्भिय परिपत्रकाची छायांकीत प्रत.

प्रतिः- सर्व विभाग प्रमुख/प्र.विभागप्रमुख/प्र.अधिकारी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

२/-सदरचे परिपत्रक आपले विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या व सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावे .

| | | | |
|---|---|---|---|
| १)स्थापत्य विभाग | २) यंत्र विभाग | ३) संगणक विभाग | ४) मॉड इलेक्टॉनिक्स विभाग |
| ५)प्लास्टीक(पॉलिमर)विभाग | ६)उपयोजित यंत्रशास्त्र | ७) विज्ञान व मानव्यशास्त्र विभाग | |

प्रत- श्री.एस.पी.काळे,प्रोग्रामर यांना संकेत स्थळावर प्रसिध्द करणे करीता.